MHYA210018912025

**आदेश निशाणी क्रमांक ०१ खाली**

[दिनांक–२९/०६/२०२६]

१] अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्याकरिता मुंबई नियमन कायदा, १८२७ चे कलम २ अंतर्गत दाखल केला आहे.

२] अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र.२ ते ७ चे वडील व अर्जदार क्र.८ ते ११ चे आजोबा नामे पांडुरंग बाबाजी मालेकर हे मौजा अकोला, ता.कोरपना, जि.चंद्रपुर येथील कायमचे रहिवासी होते. ते दि.०९/०१/२००३ रोजी मौजा अकोला, ता.कोरपना, जि.चंद्रपुर येथे मरण पावले. तसेच, अर्जदार क्र.१ व मयत पांडुरंग बाबाजी मालेकर यांचा मुलगा विजय पांडुरंग मालेकर व मुलगी उषा देवराव ताजणे हे सुध्दा मरण पावले आहेत. अर्जदार क्र.८ ते १० व ११ हे मयत विजय मालेकर व उषा ताजणे यांचे वारस आहेत. अर्जदार हे मयत पांडुरंग बाबाजी मालेकर यांचे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना मयताचे मालमत्तेचे व्यवस्थापनाकरीता आणि शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची गरज आहे. अर्जदार वगळता इतर कुणीही पांडुरंग बाबाजी मालेकर यांचे वारस नाहीत. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३] अर्जदारांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे आपला युक्तिवाद सादर केला. अर्ज व त्यासोबत दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांनी त्यांचे अर्जाचे अनुषंगाने नि.क्र.३१ नुसार जाहिरनामा प्रसिध्द केला. सदर जाहिरनाम्याची प्रत ही ग्राम पंचायत, अकोला, तहसिल कार्यालय, कोरपना, नगर परिषद, कोरपना व दिवाणी न्यायालय, कोरपना यांचे नोटीस बोर्डावर व मयताचे घरावर लावण्यात आली. तसेच, अर्जदारांनी

दि.१९/१२/२०२५ रोजीचे दैनिक लोकदुत या वृत्तपत्रात जाहीर नोटिस प्रकाशित केली. अर्जदारांनी वृत्तपत्राची प्रत जाहिर नोटिस नि.क्र.२७ वर दाखल केली आहे. परंतु, अर्जदारांचे अर्जास आक्षेप प्राप्त झाला नाही.

४] अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.७/राजु पांडुरंग मालेकर यांनी त्यांचा पुरावा नि.क्र.०८ वर दाखल केला. अर्जदारांनी मयत पांडुरंग मालेकर, विजय मालेकर, उषा ताजणे व विद्या मालेकर यांचे मुळ मृत्यु प्रमाणपत्र, मौजा पळसोणी येथील शेत गट क्र.१०२ चा ७/१२ उतारा व सर्व अर्जदारांचे आधार कार्डचे प्रमाणित प्रती, इत्यादी कागदपत्रे अनुक्रमे नि.क्र.११ ते २६ वर दाखल केले. अर्जदारांचा पुरावा अपरिवर्तित राहिला आहे. त्यावर विश्वास न ठेवता येणारी कुठलीही बाब न्यायालयासमक्ष आली नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार हे मयत पांडुरंग बाबाजी मालेकर यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत पांडुरंग बाबाजी मालेकर यांना अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. सबब, अर्जदारांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्यास कोणताही अडथळा येत नाही. म्हणून, मी पुढील आदेश पारित करीत आहे;

## आदेश

१] अर्ज मंजुर करण्यात येतो.

२] अर्जदारांना **मयत पांडुरंग बाबाजी मालेकर** यांचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात येते.

३] अर्जदारांनी विहित मुद्रांक शुल्क जमा केल्यानंतर त्यांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्यात यावे.

SHAHAJI DATTARAO BHOSLE

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE
Date: 2026.06.29 16:27:59 +0530

ठिकाण : वणी

दि.२९/०६/२०२६

**(शहाजी दत्तराव भोसले)**

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.